स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

# आरोग्य सेवा आयुक्तालय

(महाराष्ट्र राज्य)

"आरोग्य भवन", सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४०० ००१

| कार्यालय | दूरध्वनी | Website : http://maha-arogya.gov.in |
|---|---|---|
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१०३१-३६ | Email : dhs_2005@rediffmail.com |
| उपसंचालक (शुश्रृषा) | २२६२१००६<br>२२६२६७४० | Email : ddhsnursingmumbai@gmail.com |
| परिपत्रक / तात्काळ | | क्र. आसेआ /शुश्रृषा/कक्ष-९/टे-१/पीएचएन/प्रशिक्षण/सन २३-२४/ ४०३९ /२०२३<br>दि. २५ /०८/२०२३ |

प्रति,

स्त्री अधिक्षिका,

सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय, नागपुर

विषय- सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पीएचएन) सन २०२३-२४ प्रशिक्षण सत्र सुरु करण्याबाबत

संदर्भ१) आयुक्तालयाचे पत्र क्र.संआसे/ शुश्रृषा/कक्ष-९/टे-४/डीपीएन व पीएचएन प्रवेश प्रकिया सन २०२३-२४/३३२९/२३ दि.२१.०७.२०२३

२) शासन निर्णय क्रमांक प्रवेश २०२३/प्र.क्र.५५३/सेवा-५ दि.२२.०८.२०२३

३) भारतीय उपचर्या परिषद यांचे इंग्रजी पत्र दि.१३.०४.२०२३

सार्वजनिक आरोग्य परिचारीका प्रशिक्षण (पब्लीक हेल्थ नर्सिंग डिप्लोमा) (कालावधी ११ महिने) सन २०२३-२४ हे प्रशिक्षण दि.१८ ऑगस्ट २०२३ पासुन सुरु करण्यात येत आहे. खालील कालावधीत प्रवेश प्रक्रिया सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय, नागपुर येथे राबविण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पीएचएन) अभ्यासक्रमाचे (११ महिने) बाबतचे वेळापत्रक खालीलप्रमाणे.

## सार्वजनिक आरोग्य परिचारीका प्रशिक्षण प्रवेश प्रकिया २०२३-२४

### प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| १ | स्त्री अधिक्षीका, सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय , नागपुर येथुन फॉर्म वाटप कालावधी | दि.२८.०८.२०२३ ते दि.३०.०८.२०२३ |
| २ | स्त्री अधिक्षीका, सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय , नागपुर येथे अर्ज | दि.२८.०८.२०२३ ते |

| अ.क्र. | बाब | कालावधी |
|---|---|---|
| | स्विकारण्याचा अंतिम दिनांक | दि.०४.०९.२०२३ |
| ३ | प्राप्त अर्जाची पडताळणी करण्याचा कालावधी | दि.२८.०८.२०२३ ते दि.०६.०९.२०२३ |
| ४ | प्रशिक्षणासाठी पात्र अपात्र अर्जदारांची यादी तयार करणे | दि.०८.०९.२०२३ |
| ५ | निवड समिती अहवाल सभा | दि.११.०९.२०२३ |
| ६ | पडताळणी केलेले अर्ज, निवड झालेल्या व अपात्र उमदेवारांची यादी उपसंचालक (शुश्रृषा (सेवा आरोग्य, मुंबई यांना सादर करणे | दि.१४.०९.२०२३ |
| ७ | प्रशिक्षण सुरु करण्याचा दिनांक | दि.१८.०९.२०२३ |

तसेच खालील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१) प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक तंतोतंत पाळावे.

२) गठीत समितीच्या सर्व आवश्यक कागदपत्रांवर स्वाक्षरी होणे आवश्यक आहे.

३) उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा), मुंबई यांच्या कार्यालयास प्रवेश प्रक्रियेची अंतिम मान्यता घेण्यासाठी प्रस्ताव दिलेल्या वेळेत सादर करणे.

४) तसेच अर्ज वाटपामुळे मिळणा-या रक्कमेचा महसुल याचा सविस्तर अहवाल आयुक्तालयास प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

५) सदर सत्रात सार्वजनिक आरोग्य परिचारीका या प्रशिक्षणासाठी एकुण ३० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. तथापि सदर ३० विद्यार्थ्यांपैकी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयातील ७०% अधिपरिचारीका, आयुक्त वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व रुग्णालयातील २०% अधिपरिचारीका व महानगरपालिका / नगरपालिका / खाजगी क्षेत्रातील १०% अधिपरिचारीका यांची निवड करण्यात यावी. कोणत्याही स्थितीत जागा रिक्त ठेवण्यात येवू नयेत.

६) सदर प्रशिक्षणासाठी आपल्यास्तरावरुन उपसंचालक, जिल्हा शल्य चिकित्सक, महानगरपालिका व नगरपालिका यांना अवगत करण्यात यावे व सदर प्रशिक्षणाची जाहिरात जास्त खपाच्या वृत्तपत्रात देण्यात यावी.

७) सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पीएचएन ) प्रशिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थीची दोन्ही वेळी (In/ Out) दैनंदिन बायोमेट्रीक हजेरी घेणे अनिवार्य राहील तसेच सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पीएचएन ) परिचर्या प्रशिक्षण केंद्रात काम करणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी शैक्षणिक व अशैक्षणिक कर्मचारी यांची देखील बायोमेट्रीक हजेरी दोन्ही वेळी (In / Out) करणे अनिवार्य राहिल बायोमेट्रीक वेतन दिवस पारित करण्याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

८) सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पीएचएन ) येथील सर्व पाठयनिर्देशक / पाठयनिर्देशिका / सार्वजनिक आरोग्य परिचारीका यांना दैनंदिन चिकित्सालयीन अनुभव अनिवार्य करण्यात येत आहे.

९) दैनंदिन चिकित्सालयीन अनुभवासाठी सर्व पाठयनिर्देशक / पाठयनिर्देशिका / सार्वजनिक आरोग्य परिचारीका यांना सकाळी ९ ते १२ या सत्रात संलग्न रुग्णालयात रुग्ण सेवेशी निगडीत काम करणे/

प्रशिक्षण घेणे व देणे अनिवार्य राहील व प्रशिक्षणार्थी समवेत सर्व पाठयनिर्देशक / पाठयनिर्देशिका / सार्वजनिक आरोग्य परिचारीका यांनी ही वॉर्ड मध्ये आळीपाळीने सेवाविषयक जबाबदारी देण्यात याव्यात.

१०) प्रवेश अर्ज फी, प्रवेश फी , पाठय शुल्क व इतर सर्व शुल्क एकत्रित जिल्हा शल्य चिकित्सक व परिचर्या अधिकारी यांच्या संयुक्त खात्यावर जमा करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल वेळावेळी आयुक्तालयास सादरकरण्यात यावा. तसेच त्यातील रक्कम आयुक्तालयाच्या मान्यतेशिवाय खर्ची टाकण्यात येवू नये.

११) प्रवेश अर्ज फी, प्रवेश फी , पाठय शुल्क व इतर सर्व शुल्क भरण्यात येणा-या रकमेबाबत रितसर पावती पुस्तक छपाई करुन घेण्यात यावे.

१२) वृत्तपत्रातील जाहिरात, अर्ज छपाई व पावती पुस्तक छपाई याबाबत खर्च जमा रकमेतून करण्यात यावा तसेच उक्त खर्चाबाबत आयुक्तालयाची कार्योत्तर मंजूरी घेण्यात यावी. सदर कार्योत्तर मंजूरी साठी प्रस्ताव सादर करताना कार्यालयीन मान्य टिपणी व इतर आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

उक्त वेळापत्रकाचे व सोबत जोडण्यात आलेल्या नियम पुस्तिकेतील नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व याबाबतचा अनुपालन अहवाल आयुक्तालयास सादर करण्यात यावा.
(मा.आयुक्त यांच्या मान्य टिपणीनुसार)

(डॉ.नागनाथ मुदम)
उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) , मुंबई.

प्रत-
१) मा.आयुक्त, महानगरपालिका व नगरपालिका (सर्व.......)
२) उपसंचालक, आरोग्य सेवा , परिमंडळे (सर्व...........)
३) वैद्यकिय अधिक्षिका, डागा स्मृती रुग्णालय, नागपुर
४) जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व..................)

प्रत सविनय सादर-
मा.अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (सेवा-५), मंत्रालय, मुंबई.

(महाराष्ट्र शासन)

# सार्वजनिक आरोग्य विभाग, आरोग्य सेवा आयुक्तालय

**सार्वजनिक आरोग्य परिचारीका प्रशिक्षण**

(पी.एच.एन.) (कालावधी ११ महिने)

# प्रवेश नियम पुस्तिका व प्रवेश अर्ज

# सन २०२३-२०२४

आरोग्य भवन, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड,मुंबई- ४०० ००१

संकेतस्थळ - http://arogya.maharashtra.gov.in

ईमेल - ddhsnursingmumbai@gmail.com

दुरध्वनी - ०२२- २२६२६७४०

**आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई**
**सार्वजनिक आरोग्य परिचारीका प्रशिक्षण (पीएचएन)**
**प्रवेश प्रकिया सन २०२३-२४**

**सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात आरोग्य सेवा आयुक्तालय,मुंबई यांच्या अधिनस्थ असलेले सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्याालय,नागपुर येथे सार्वजनिक आरोग्य परिचारीका प्रशिक्षण (पीएचएन) या ११ महिने अभ्यासक्रमाकरीता खालील कार्यपध्दती प्रसिध्द करण्यात येत आहे.**

१) **सामान्यः**- हे नियम महाराष्ट्र राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्थ आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय, नागपुर परिचर्या प्रशिक्षण संस्थामधील ११ महीने कालावधीच्या “सार्वजनिक आरोग्य परिचारीका ”(पी.एच.एन)प्रशिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी लागु राहतील.

२) **व्याख्याः**-

- राज्य शासन याचा अर्थ , महाराष्ट्र शासन होय.
- सार्वजनिक आरोग्य विभाग म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत ग्रामीण ते शहरी भागात प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, संर्वधनात्मक दर्जेदार सेवा पुरविण्यासाठी, विविध स्तरावर विविध योजना राबविण्यासाठी काम करणारा आरोग्य विभाग होय.
- आयुक्तालय म्हणजे आरोग्य सेवा आयुक्तालय होय.
- “आयुक्त (आरोग्य सेवा) व संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान )" हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयाचे प्रमुख होय.
- उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) म्हणजे आरोग्य सेवा आयुक्तालयांर्गत शुश्रृषा विभागाचे प्रमुख होय.
- सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) म्हणजे आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत शुश्रृषा विभागाच्या प्रमुखास सहाय्य करणारे होय.
- प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी (Competent Authority) म्हणजे राज्य स्तरावर आयुक्त (आरोग्य सेवा) व संचालक (राष्ट्रीय आरोग्य अभियान ) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती आणि वैद्यकिय अधिक्षिका डागा स्मृती रुग्णालय, नागपुर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेली समिती होय.
- “सार्वजनिक आरोग्य परिचारीका" म्हणजे समाजाला रुग्णालये व क्षेत्रिय स्तरावर प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, संवर्धानात्मक सेवा देणारी तसेच क्षेत्रिय आरोग्य कर्मचा-यांचे पर्यवेक्षण व व्यवस्थापन करणारी प्रशिक्षण देणारा ११ महिन्याचा अभ्यासक्रम होय.
- उमेदवार म्हणजे जीएनएम / बेसिक बीएसस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम उत्तीर्ण आणि या अभ्यासक्रमास प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी होय.

- महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ,मुंबई हे राज्यस्तरावर परिचर्या प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणाची नोंदणी व नुतनीकरण करणारी शासनाच्या अधिनस्थ कार्यरत स्वायत्त संस्था होय.

## ३) प्रवेश प्रक्रियेचे सक्षम प्राधिकारी (Competent Authority):-

### १) राज्यस्तरीय प्रवेश प्रक्रिया राबविणारी समिती:-

संपुर्ण प्रवेश प्रक्रियेचे आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान हे सक्षम प्राधिकारी राहतील. सक्षम प्राधिकारी त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यामार्फत सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय, नागपुर येथे निवड समितीने केलेल्या प्रवेश प्रक्रियेची तपासणी करतील व प्रवेश प्रक्रियेस अंतिम मान्यता देतील. यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त केली आहे. प्रवेश प्रक्रियेबाबत कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सक्षम प्राधिकारी (आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक) निर्णय घेतील व त्यांचे निर्णय अंतिम असुन सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहतील.

| | |
|---|---|
| मा.आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान | अध्यक्ष |
| मा.संचालक, आरोग्य सेवा | सदस्य |
| उपसंचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) | सदस्य सचिव |
| मुख्य प्रशासकिय अधिकारी,आरोग्य सेवा | सदस्य |
| सहायक संचालक, आरोग्य सेवा (शुश्रृषा) | सदस्य |

**सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय, नागपुर प्रवेश प्रक्रिया राबविणारी समिती:-**

| | | |
|---|---|---|
| १) | वैद्यकिय अधिक्षिका, डागा स्मृती रुग्णालय, नागपुर | अध्यक्ष |
| २) | मुख्य प्रशासकिय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा,नागपुर | सदस्य |
| ३) | अधिसेविका, डागा स्मृती शासकिय रुग्णालय, नागपुर | सदस्य |
| ४) | वरिष्ठ पाठयनिर्देशिका, सार्वजनिक आरोग्य, शुश्रृषा विद्यालय, नागपुर | सदस्य |
| ५) | स्त्री अधिक्षिका, सार्वजनिक आरोग्य शुश्रृषा विद्यालय, नागपुर | सदस्य सचिव |

## ४) जागा वाटप:-

सार्वजनिक आरोग्य परिचारीका या प्रशिक्षणासाठी एकुण ३० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा. तथापि सदर ३० विद्यार्थ्यांपैकी सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या अधिनस्थ असलेल्या सर्व रुग्णालयातील ७०% अधिपरिचारीका, आयुक्त वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व रुग्णालयातील २०% अधिपरिचारीका व महानगरपालिका / नगरपालिका / खाजगी क्षेत्रातील १०% अधिपरिचारीका यांची निवड करण्यात यावी.

## पोस्ट बेसिक डिप्लोमा सार्वजनिक आरोग्य परिचारिका ( ११ महिने) जागा वाटपाचे विवरणपत्र -

| विभाग | कोटा | अ जा | अ ज | वि जा अ | भ ज ब | भ ज क | भ ज ड | विमाप्र | इमाव | आर्थिक दुर्बल घटक | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक आरोग्य विभाग | २१ | ३ | १ | ३ | | | | ० | ४ | २ | ८ |
| वैद्यकिय शिक्षण विभाग | ६ | १ | ० | ० | | | | ० | १ | १ | ३ |
| महानगरपालिका, नगरपालिका व खाजगी | ३ | ० | ० | ० | | | | ० | १ | ० | २ |
| **एकुण** | **३०** | **४** | **१** | **३** | | | | **०** | **६** | **३** | **१३** |

- उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा .
- अपंग आरक्षण :-
  इंडियन नर्सिंग कॉन्सिलच्या पत्र क्र.एफनं.१-५/२०१८ आयएनसी दि.१९.०४.२०१९ च्या परिपत्रकानुसार "For Disabled candidates: ५% Disability of locomotor to the tune of ४०% to ५०% of the lower extremity". या अपंग आरक्षणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

### ५) शुल्क आकारणी:-

- प्रवेश अर्ज शुल्क- खुला प्रवर्गासाठी रु. १५००/- (रुपये एक हजार पाचशे फक्त)
  राखीव प्रवर्गासाठी रु.१०००/- (रुपये एक हजार फक्त)
- निवड झालेल्या उमेदवारांना भोजन खर्च, पुस्तके, स्टेशनरी, गणवेश इत्यादी खर्च स्वत: करावा लागेल, तसेच नोंदणी व पात्रता शुल्क,(Enrolment fees ) परिक्षा शुल्क, एसएनए सदस्यता शुल्क यांची विहित शुल्क संस्थेत भरणा करावा लागेल.
- या अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या दरानुसार राहील.
- निवड झालेल्या उमेदवारांना अभ्यास शुल्क प्रवेशाच्यावेळीच भरावे लागेल. प्रवेश शुल्क भरल्यानंतरच विद्यार्थ्यांचा प्रवेश ग्राहय धरला जाईल.
- शैक्षणिक शुल्क शासन निर्णय क्रमांक एएमसी१००७/६२८/प्र.क्र.१४८/०७/शिक्षण २ दि.०१.०३.२०११ प्रमाणे आकारले जाईल.

| अ.क्र.. | शैक्षणिक शुल्काचा तपशिल | शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क | रु.१५००/- |
| २ | पाठय शुल्क | रु.१०५०/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | ग्रंथालय अनामत ( परतावा योग्य) | रु. २०००/- |
| ४ | वस्तीगृह भाडे | रु.४०००/- |
| ५ | जिमखाना / कल्चरल शुल्क (वार्षिक) | रु.५००/- |
| ६ | ग्रथांलय शुल्क (वार्षिक) | रु. १०००/- |
| ७ | संकिर्ण (वार्षिक) | रु५००/- |
| | **एकुण** | **रु.१०५५०/-** |

- शैक्षणिक शुल्क माफीची योजना शासनाच्या वेळोवेळी अमंलात असणा-या आदेशानुसार संबंधिताना अनुज्ञेय राहतील.

## ६) निवड झालेल्या उमेदवारांना प्रमाणपत्रे करीता सादर करावयाची कागदपत्रे:-

- शाळाचा दाखलामहाविद्यालय सोडल्या /
- १० वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- १२ वी उत्तीर्ण गुणपत्रिका व प्रमाणपत्र
- जीएनएम/ बेसीक बीएसस्सी उत्तीर्ण गुणपत्रक व प्रमाणपत्र
- अर्हताकारी परिक्षा किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले त्याबाबतचे शाळा महाविद्यालयाचे प्रमाणपत्र / ( Attempt Certificate)
- महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई यांचेकडे नोंदीणी केलेले व नुतनीकरण केलेले प्रमाणपत्र
- शासकिय सेवेतील प्रवेशित परिचारीकांना प्रवेशाच्या दिनांकास कमीत कमी ५ वर्षाचा अधिपरिचारीका या पदावरील काम केल्याचा अनुभव असल्याचे प्रमाणपत्र.
- शासकिय सेवेतील प्रवेशित परिचारीकांना प्रवेशाच्या दिनांकास सदर पदाची सेवानियमित असणे आवश्यक असूनसोबत आदेशाची प्रत जोडावी.
- मागास प्रवार्गातील उमदेवाराना जातीचे प्रमाणपत्र व जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
- महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
- भारतीय नागरिकत्वाचा दाखला (Nationality Certificate)
- नॉन क्रिमीलेअर दाखला आवश्यकतेनुसार
- शासकिय रुग्णालयातील सक्षम वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणित केलेले वैद्यकिय प्रमाणपत्र (सोबतच्या विहीत नमुन्यानुसार)
- आधार कार्ड

वरील सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती प्रवेशाच्या वेळी आणणे आवश्यक आहे. तसेच मुलाखतीच्या वेळी सर्व प्रमाणपत्राच्या मुळ प्रतीची छाननी करण्यात येईल.

## ७) वयोमर्यादा:-

दि.३१.०७.२०२३ रोजी उमेदवाराचे वय ५०वर्षापेक्षा जास्त असु नये.

## ८) निवडप्रक्रिया:-

- प्राप्त झालेल्या अर्जातुन उमेदवारांची निवड विहित आरक्षणानुसार,गुणवत्ता व सेवाजेष्ठता यांचा विचार करुन करण्यात येईल.
- गुणवत्ता यादी - जीएनएम/ बेसिक बीएसस्सी (नर्सिंग) च्या सर्व वर्षाच्या अंतिम परिक्षेच्या गुणांची बेरीज करुन सर्वसाधारण गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.
- समबंध - सर्व साधारण गुणवत्ता यादी मध्ये समबंध झाल्यास खालीलप्रमाणे प्राधान्यक्रमाने उमेदवारांची निवड करण्यात येईल.

  १) प्रथम प्राधान्य बारावीचे अंतिम गुण जास्त असलेला उमेदवार

  २) द्वितीय प्राधान्य दहावीचे अंतिम गुण जास्त असलेला उमेदवार

  ३) तृतीय प्राधान्य समबंध झालेल्या उमेदवारांपैकी वयाने जास्त असलेला उमेदवार

**राखीव उमेदवारांसाठी खाली दर्शविल्यानुसार आरक्षण असेल -**

| अ.क्र. | प्रवर्ग | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व बौध्द धर्मातरीत अनुसूचित जाती ( अ.जा ) | १३.० |
| २ | अनुसूचित जमाती ( निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह ) ( अ.ज. ) | ७.० |
| ३ | निरधि सूचित जमाती ( अ ) विमुक्त जाती ) वि.जा. ( अ) | ३.० |
| ४ | भटक्या जमाती - (ब) भ.ज. ( ब) | २.५ |
| ५ | भटक्या जमाती - (क) भ.ज. ( क) | ३.५ |
| ६ | भटक्या जमाती - (ड) भ.ज. ( ड) | २.० |
| ७ | इतर मागास वर्ग ( इमाव ) | १९.० |
| ८ | आर्थिक दुर्बल घटक | १०.० |

- **आंतर प्रवर्ग गट - ( Inter-se merit )**

  **<u>गट - १</u>**

  १ ) अ.जा. व बौध्द धर्मांतरीत

  २ ) अ.ज.( निर्देशित क्षेत्रांच्या बाहेर राहणा-यांसह )

  **<u>गट - २</u>**

  १ ) वि.जा. ( अ)

  २ ) भ.ज. ( ब)

  **<u>गट -३</u>**

  १ ) भ.ज. ( क)

२ ) भ.ज. ( ड)

३) इ.मा.व. व वि.मा.प्र.

## ९ ) परिक्षेचे स्वरुप :-

| अ.क्र. | विषय | कालावधी | अंतर्गत गुण | बाहय गुण | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| विभाग अ | | | | | |
| पेपर १ | Principal and Practice of P.H.Nursing | ३ तास | २५ | ७५ | १०० |
| पेपर २ | Preventive Social Medicine &Microbiology Nutrition and Health Problems | ३ तास | २५ | ७५ | १०० |
| पेपर ३ | Applied Psychology Sociology | ३ तास | २५ | ७५ | १०० |
| विभाग ब | | | | | |
| मौखिक व प्रात्याक्षिक | | | ३० | ७० | १०० |

*** प्रशिक्षणार्थ्यांनी कमीत कमी ५० टक्के गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.**

*** तसेच अनुत्तीर्ण उमेदवारांना कमीत कमी २ प्रयत्नांत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.**

## १०) सेवातंर्गत शासकिय उमेदवारांसाठी :-

महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१ प्रकरण ७ - अध्ययन रजा ( ८० ते ९३) अन्वये,

- सेवातंर्गत उमदेवारांना म.ना.से. सेवा नियम १९८१ मधील अध्ययन रजा नियम ८० ते ९३ मधील तरतुदीनुसार अध्यन रजेबाबत कार्यवाही केली जाईल.
- ज्या सेवातंर्गत उमेदवारांनी यापुर्वी प्रतिनियुक्ती / अध्ययन रजेचा फायदा घेतलेला आहे असे सेवातंर्गत उमेदवारांना म.ना.से. रजा नियम १९८१ मधील अध्ययन रजा नियम ८० ते ९३ मधील तरतुदीनुसार अध्ययन रजा मंजुर करता येणार नाही.
- अध्ययन रजेबाबत सर्व अधिकार व अंतिम निर्णय हा शासनाचा असेल
- प्रवेशासाठी निवड झालेल्या सेवातंर्गत उमदेवारास ५ वर्षे शासकिय सेवा करण्याचे सामाजिक दायित्व सेवा पत्र विहित नमुन्यात द्यावे लागेल. जर उमेदवारांने अभ्यासक्रमानंतर शासन सेवेतील ५ वर्षे शासन सेवा केली नाही तर प्राशिक्षण काळात अदा करण्यात आलेले वेतन व भत्त्याची रक्कम शासन नियमानुसार एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

## ११) शिस्त व वर्तणुक व प्रशिक्षणादरम्यान पाळावयाचे नियम:-

प्रशिक्षणार्थि यांचे कडुन खालील नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी .

१) विद्यार्थ्यांनीना वर्गात व रुग्णालयामध्ये मोबाईल फोन वापरण्यास सक्त मनाई आहे .

२) महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांच्या नियमानुसार प्रशिक्षणार्थ्याला वैद्यकिय

रजेसहित एकुण १० दिवसांची रजा अनुज्ञेय राहील. त्या व्यतिरीक्त कोणतीही रजा अनुज्ञेय राहणार नाही .तसेच प्रशिक्षण कालावधीत विवाह / गरोदरपण असल्यास प्रशिक्षण पुर्ण करणे ही प्रशिक्षणार्थीची जबाबदारी राहील .

३) विद्यार्थ्याविरुध्द कोणत्याही गुन्हयाची नोंद किंवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबीत असू नये याबाबत खोटी माहिती दिल्याचे आढळुन आल्यास प्रशिक्षणार्थिला प्रशिक्षणातून काढुन टाकण्यात येईल .

४)विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कालावधीत वारंवार सुटटीवर जाऊ नये.

५) विद्यार्थी प्रशिक्षण कालावधीत कोणत्याही कारणास्तव लेक्चरला गैरहजर असल्यास तसेच परिक्षेसाठी उपस्थितीचे दिवस कमी पडल्यास तीला महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ नियमानुसार परिक्षेला बसता येणार नाही.

६) भारतीय परिचर्या परिषद व महाराष्ट्र राज्य शुश्रृषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांनी नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या नियमांचे पालन विद्यार्थ्यांनी काटेकोरपणे करणे आवश्यक आहे .

७) शैक्षणिक सहली, भेटी, ग्रामीण अनुभव, आऊट पास इ. साठी बाहेर गेल्यावर एखादी दुर्घटना घडल्यास संस्था जबाबदार राहणार नाही

८) प्रशिक्षाणा दरम्यान विद्यार्थ्यांनी कोणतेही बेकायदेशीर / अनैतिक कृत्य करु नसे असे केल्यास त्या विद्यार्थ्यांनीवर वैयक्तिकरित्या संपुर्ण जबाबदारी राहील व तीला प्रशिक्षणातुन काढण्याचे अधिकार संस्था प्रमुखांना असतील.

९) कोणत्याही सबबीवर नातेवाईक/ मैत्रिण / मित्र/ पुरुष कर्मचारी यांना महिला वसतीगृहात येण्यास सक्त मनाई आहे.

१०) वसतीगृहात विजेची शेगडी व विद्युत उपकरणे वापरण्यास सक्त मनाई आहे.

११) परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील वसतिगृह हे केवळ विद्यर्थिंनी परिचारीका करिता आहे. वसतीगृहाचा वापर केवळ विद्यार्थीनी परिचारीकांकरिता करण्यात यावा. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्था प्रमुखांची राहील.

- मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०२/०४/२००८ च्या आदेशान्वये लिंगडोह समितीच्या रॅगिंग विरोधी शिफारशीनुसार तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४.१२.२००९ च्या नियमानुसार, विद्यार्थीनींचा रॅगिंग मध्ये सहभाग आढळून आल्यास त्यास प्रशिक्षणातून काढून ( Rusticate ) टाकण्यात येईल,व तसे शपथपत्र लिहून घेतले जाईल.
- खालील प्रमाणे रॅगिंग विरोधी समिती गठीत आहे.

| | |
|---|---|
| जिल्हा शल्य चिकित्सक | अध्यक्ष |
| अधिसेविका | सदस्य |

| | |
|---|---|
| परिचर्या अधिकारी | सदस्य |
| विद्यार्थी प्रतिनिधी | विद्यार्थी प्रतिनिधी |

- नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना उपरोक्त समिती सदस्यांचे दुरध्वनी क्रमांक दिले जातील.
- महाराष्ट्र शासनाच्या सन १९९९ च्या रॅगिंग विरोधी कायद्याचे पालन करणे सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना बंधनकारक आहे.

## १२) <u>विशेष सुचना</u>:-

- उमेदवाराना प्रवेशाच्या वेळी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित (अ‍ॅटेस्टेड) सत्यप्रती सादर कराव्यात. मुळ प्रमाणपत्रे प्रवेशाच्या वेळी पडताळणी करिता संस्थाप्रमुखांना सादर करावीत. एनरॉलमेंट/ आवश्यक पडताळणीनंतर मुळप्रमाणपत्रे उमेदवारास परत करण्यात येतील. मुळ प्रमाणपत्रे व गुणपत्रिकांच्या छाननी किंवा पडताळणीच्या वेळी कोणत्याही त्रुटी, चुकीची माहिती किंवा गुणपत्रिकेत अनधिकृत खाडाखोड अथवा बदल केल्याचे आढळुन आल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज तात्काळ नाकारण्यात येईल. किंबहुना त्याला आधिच प्रवेश देण्यात आला असल्यास तो रद्द करण्यात येईल. प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे मुळ प्रमाणपत्रे हे कार्यालयात जमा करुन घेण्यात यावीत. कोणत्याही सबबीवर एनरॉलमेंट पुर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांना मुळ प्रमाणपत्रे परत देण्यात येवु नये. याची नोंद प्राचार्यानी घ्यावी.
- प्रवेशासाठी केलेल्या दाव्यानुसार आवश्यक असलेली सर्व प्रमाणपत्रे प्रवेशाच्यावेळी सादर करण्यात यावी. प्रवेश अर्जात केलेल्या दाव्या व्यतिरिक्त नंतर केलेला कोणताही दावा विचारात घेण्यात येणार नाही.
- प्रशिक्षणाकरता पात्र ठरविण्यात आलेला उमदेवार शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. यारिता ज्या संस्थतेत उमेदवाराने अर्ज केलेला असेल, त्याच संस्थेत त्याची वैद्यकिय तपासणी केल्यानंतरच उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र ठरेल. वैद्यकिय तपासणीत उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्टया अपात्र ठरल्यास प्रशिक्षणातुन काढुन टाकण्यात येईल. सदर तपासणी संस्था प्रमुखांनी एक महिन्यात करुन घेणे बंधनकारक राहील.
- सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पीएचएन )प्रशिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थीची दोन्ही वेळी (In / Out) दैनंदिन बायोमेट्रीक हजेरी घेणे अनिवार्य राहील.
- एखादा प्रशिक्षणार्थी अर्धवट प्रशिक्षण सोडुन गेल्यास प्रशिक्षणाच्या मध्यावर दुस-या प्रशिक्षणार्थीला प्रवेश देणे शक्य नसते, अशा प्रकारे जागा रिक्त राहून एका होतकरु गरजवंत उमेदवाराचे शैक्षणिक नुकसान होते.यास्तव प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास व कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास **"लॅप्स ऑफ सीट"** चे शुल्क रु.५०,०००/- इतकी रक्कम दंड म्हणून वसुल करण्यात येईल,व सदर शुल्काची शासनपावती देण्यात येईल.

*************************

# महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा -

आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

सार्वजनिक आरोग्य परिचारीका (पी.एच.एन.) (कालावधी ११ महिने)

प्रवेश अर्ज

सन २०२३-२०२४

---

प्रवेश अर्ज क्र

Passport Size Recent Photo

प्रवेश अर्ज मूल्य : रु.१५००/- खुल्या प्रवर्गासाठी
रु.१०००/- मागास प्रवर्गासाठी

---

**विशेष सूचना**- अ) अर्जदाराने अर्जातील प्रत्येक नोंद योग्य , संपूर्णपणे सुवाच्य व स्वहस्ताक्षरात भरणे आवश्यक आहे व अर्जासोबत आवश्यक प्रमाण पत्राच्या साक्षांकीत (अटेस्टेड) प्रती जोडलेल्या असाव्यात

ब ) अर्जात खाडाखोड करण्यात येऊ नये.

---

१. Name In Full : - ..........................................................................

(BLOCK LETTERS) Beginning with Surname

Mother◦s name ..........................................................................

२. Nationality ..........................................................................

३. Date of Birth & Age ..........................................................................

४. Present Postal Address..........................................................................

..........................................................................

५. Permanent Address:-......................................................................................

.......................................................................................

Phone No :-.........................................................................................

Personal Email ID :-........................................................................................

Office Email ID :-........................................................................................

६. Aadhar card no. :-........................................................................................

७. Working under : - D.M.E.R

D.H.S.

Mahanagarpalika

Nagar Palika

Private

८. Religion :-.........................................................................................

Caste:-.........................................................................................

Category :-.........................................................................................

९. Are you married, unmarried, widow,

If married, name of husband:-........................................................................

Unmarried name of father:-........................................................................

Occupation of husband / Father :-..................................................................

Number of children, if any & their ages:-...........................................................

१०. Academic Qualification:-

| Exam | Seat No | Year of passing | Marks obtained | Marks Out of | Percentage | Attempt |
|---|---|---|---|---|---|---|
| S.S.C | | | | | | |
| H.S.C. | | | | | | |
| General Nursing & Midwifery / Basic B.Sc. Nursing | | | | | | |
| Fist Year | | | | | | |
| Second Year | | | | | | |
| Third Year | | | | | | |
| Fourth Year / Internship | | | | | | |
| Grand Total | | | | | | |

In support copies of the mark lists should be attached

११. Languages known:-

| Knowledge of | Marathi | English | Hindi |
|---|---|---|---|
| १) Read | | | |
| २) Write | | | |
| ३) Speak | | | |

१२. Professional qualification:

A. Name of Qualification :-.........................................................................

B. Name of Nursing training college:- ......................................................

C. Name of the State Nursing Council -...............................................................

D. M.N.C. Registration

Number & Renewal date:-..........................................................................

१३. Experience in Hospital or any other Health Facilities :-

| Sr. No. | Name of the Institute | Date of appointment | Period | | Worked As | Total Years of experience |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Form | To | | |
| I) | | | | | | |
| II) | | | | | | |
| III) | | | | | | |
| IV) | | | | | | |

१४) Hobbies & Extracurricular activities

Sports :- ..............................................................................................................

Dramatics:- ..............................................................................................................

Music:- ..............................................................................................................

Debate:- ..............................................................................................................

१५) Is the candidate willing to serve this state for ५ years Yes / No

after successfully completed the course? (In service candidates only)

१६) Do you have any chronic Medical Health issue Yes/No

१७ ) If yes ,Do you take medicine for the same Yes/No

# Declaration

I hereby declare that I have read the rules of regulation for DPN admission & after understanding , I have filled the admission form for PHN.

I have written all the information in my own handwriting & information provided is true to the best of my knowledge. I further understand that, in case if the information is found to be incorrect or false my admission will automatically stand cancelled.

I fully understand that the head of School of Public Health Nursing have authority to rusticate (Expel) me from the course and initiate disciplinary action for any misbehaviour, ragging and anti social behaviour from myside.

Date:

Place:

Signature of applicant

The application is duly endorse by me. I have no objection if may son/daughter/wife undergo the training of PHN.

Signature of Father / Husband / Guardian

Enclosures: - Attested copies of the certificates.